**Time : 2½ Hours** **MARATHI LANGUAGE II**

**Subject Code**

| H | 4 | 2 | 3 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 6)** **Maximum Marks : 80**

***सूचना:*** (*i*) प्रत्येक मुख्य प्रश्नांचे उत्तर नव्या पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांचे क्रमांक स्पष्ट लिहा.

(*iii*) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

1. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 6

(1) ''जगातलं सारं अन्न गेलं कुठं ?''

(2) ''लोक आपल्याला भिकारी म्हणतील ? म्हणू दे ?''

(3) ''आशू गेला पण त्याचे डोळे जिवंत दुसऱ्याला नवजीवन देणारे.''

(ब) खालीलपैकी कोणत्याही **एका**चे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 6

(1) सद्‌गुरुराया माझा आनंदसागर

त्रैलोक्या आधार गुरुराव

(2) याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले

(3) गनवेश फाटलाय पन चालंल मला

2. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे **3** ते **4** ओळींत लिहा : 6

(1) काझिरंगा अभयारण्यातला फॉरेस्ट बंगला कसा होता ?

(2) महात्माजींच्या कोणत्या गोष्टी लेखकाला अद्‌भूत व चमत्कारिक वाटतात ?

(3) खोलीला कुलूप ठोकून लेखकाला पळून का जावे लागले ?

(ब) खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य शब्द वापरून पूर्ण करा : 4

(1) वत्स न देखता ...................... हुंबरती.

(गाई, आई, माई)

(2) ...................... नक्षत्रें बहुत, एक परि प्यारा.

(अंबरी, नभी, गगनी)

(3) ...................... कुढायचं की प्रकाशात उडायचं.

(अंधारात, काळोखात, तिमिरात)

(4) शिंपत जावं स्वत:ला ......................

उगवलेलं चाखण्याची हाव जिरवत जावं

(रेतीवर, धरतीवर, मातीवर)

3. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर प्रत्येकी **7** ते **8** ओळींत लिहा : 5

(1) डॉ. माशेलकरांच्या आयुष्यात जादूचा दिवस कसा उगवला ?

(2) 'मांजर व्हा' पाठात मांजर झालेल्या लेखकाने केळकरीण बाईला कसा घडा शिकविला ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर प्रत्येकी **7** ते **8** ओळींत लिहा : 5

(1) अंतरीचा ज्ञानदिवा तेवत ठेवण्यासाठी सोहिरोबानाथ काय करायला सांगतात ?

(2) 'देखणे ते चेहरे' कवितेत मानवी सौंदर्य खुलविणाऱ्या कोणत्या गुणांचे वर्णन कवी करतात ?

4. (अ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा : 4

माझ्या हातातील सारी आयुधं निकामी केली आणि विरथ करून मला भूमीवर पाडलं.

(आ) खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा : 3

(अ) वडील

(आ) धीर

(इ) सावध

(इ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 3

(अ) थोडे

(आ) ज्ञान

(इ) आशा

(ई) खालील शब्दांची विशेषणे लिहा : 2

(अ) गुण

(आ) प्रेम

(उ) खालील शब्दांचे वचन बदला : 2

(अ) पाकळी

(आ) डोळे

(ऊ) खालील शब्दांचे लिंग बदला : 2

(अ) कारभारी

(आ) मैत्रीण

(ए) 'प' गटातील वाक्प्रचार आणि 'फ' गटातील वाक्प्रचारांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 4

| 'प' | 'फ' |
|---|---|
| (अ) कान टवकारणे | – जबाबदारी स्वीकारणे |
| (आ) रंगात येणे | – ऐकण्यासाठी सावध होणे |
| (इ) हुज्जत घालणे | – प्रभाव टाकणे |
| (ई) अंगावर घेणे | – खुलून दिसणे |
| | – वाद घालणे |

5. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :

नागरिकांच्या जीवनात कोणकोणत्या गोष्टी येतात हे जर आपण तपासावयास लागलो तर भिन्न भिन्न वृतीचे लोक भिन्न भिन्न गुणांवर व गोष्टींवर जोर देतात ................. काही लोक वक्तशीरपणा,

व्यवस्थितपणा, नियमितपणा या गुणांवर जोर देतात. सामुदायिक जीवनात, सार्वजनिक जीवनात वक्तशीरपणा व व्यवस्थितपणा हे गुण अत्यंत आवश्यक आहेत ते नसतील तर फार गोंधळ होतो व अनेकांच्या गैरसोयी होतात. खरोखर नियमितपणा हा आपला धर्म झाला पाहिजे. सूर्य, चंद्र, ऋतू ठरल्यावेळी येतात. नियमितपणाचा अभाव म्हणजे संयमाचा अभाव म्हणजेच सामर्थ्याचा नाश होय. आपण नियमित नसणे म्हणजे आपण आपल्या आसक्तींना व मोहांना बळी पडणे हाच त्याचा अर्थ होय. दुसऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आपण आपला आळस व इतर सुख दूर ठेवून नियमित व वक्तशीर झाले पाहिजे.

—साने गुरुजी

प्रश्न :

(1) सामुदायिक जीवनात कोणते गुण आवश्यक आहेत ? 1

(2) लेखकाच्या मते नियमितपणाच्या अभावामुळे कोणत्या गोष्टींचा नाश होतो ? 1

(3) आपण नियमित नसण्याचा कोणता अर्थ लेखक सांगतात ? 1

(4) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या ? 1

6. (अ) 'विद्याविकास उच्च माध्यमिक विद्यालय' म्हापसा येथे संपन्न झालेल्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाचा वृतान्त **8** ते **10** ओळींत लिहा. 5

(ब) ज्ञानमंदीर उच्च माध्यमिक विद्यालय, वास्को येथे आयोजित केलेल्या 'शिक्षकदिन' समारंभाची कार्यक्रमपत्रिका तयार करा. 4

7. 'रक्तदानाचे महत्व' या विषयावर दोन मित्र/मैत्रिणीं मधील संवाद **10** ते **12** ओळींत लिहा. 5

8. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **वीस** ओळींत निबंध लिहा : 10

(1) परीक्षा नसल्या तर............

(2) मी अनुभवलेला सूर्यास्त

(3) मोडक्या पुलाचे आत्मवृत्त

(4) दहशतवाद-एक गंभीर समस्या

(5) माझा आवडता अभिनेता/अभिनेत्री